# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**भारतीय भाषा आणि भारतीय ज्ञानव्यवस्था राष्ट्रीय केंद्र**

mbss.sppu@gmail.com

**National Centre for Indian languages and Indian Knowledge System**


१९.०८.२०२४

**प्रति,**
**संलग्नित सर्व महाविद्यालये/परिसंस्था/ विद्यापीठ विभाग**
**पुणे, नाशिक आणि अहमदनगर जिल्हे आणि सिल्वासा.**

विषय : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या भारतीय भाषा आणि भारतीय ज्ञानव्यवस्था राष्ट्रीय केंद्राद्वारा विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये/परिसंस्थांना ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध **'भारतीय ज्ञान व्यवस्था (Indian Knowledge System) जेनेरिक' हा सर्व विद्याशाखांतील पदवी अभ्यासक्रम आराखड्यात अंतर्भूत असलेला पहिल्या सत्रासाठीचा २ श्रेयांकांचा अनिवार्य पाठ्यक्रमासाठी नोंदणी.**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या *भारतीय भाषा आणि भारतीय ज्ञानव्यवस्था राष्ट्रीय केंद्रा* (National Centre for Indian Languages and Indian Knowledge System) द्वारे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत सर्व विद्याशाखांच्या पदवीस्तर अभ्यासक्रम संरचनेत समाविष्ट **भारतीय ज्ञान व्यवस्था (Indian Knowledge System-Generic)जेनेरिक** ह्या अनिवार्य विषयासाठी २ श्रेयांकांचा पाठ्यक्रम online पद्धतीने ऐच्छिक पातळीवर उपलब्ध करून देण्यात आला आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या *भारतीय भाषा आणि भारतीय ज्ञानव्यवस्था राष्ट्रीय केंद्राने* ही online अध्ययनपूरक पाठ्यक्रमनिर्मिती अतिशय सर्जनशील, कलात्मक व स्वयंअध्ययनपूरक अशी केली आहे.

आपल्या महाविद्यालयात/परिसंस्थेतील पदवीस्तर प्रथम सत्राच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी एकूण ३० तासाचा Indian Knowledge System Generic हा online २ श्रेयांकांचा पाठ्यक्रम विद्यापीठाच्या संकेतस्थळावर IKS प्लॅटफॉर्मवर आता उपलब्ध झाला आहे. ह्या प्लॅटफॉर्मवर विद्यार्थी self-paced पद्धतीने पाठ्यक्रमाचे अवलोकन करू शकतील. विद्यार्थ्यांची अंतिम परीक्षा MCQ based online पद्धतीने भारतीय भाषा आणि भारतीय ज्ञानव्यवस्था राष्ट्रीय केंद्रातर्फे घेण्यात येईल. विद्यार्थ्यांचे श्रेयांक/ गुण महाविद्यालयाला कळविण्यात येतील. अंतर्गत मूल्यमापन आणि इतर सर्व प्रक्रियांसाठीची प्रमाणित कार्यप्रणाली ह्यासंदर्भातील सविस्तर माहिती ऑनलाईन बैठकीद्वारे ह्याच आठवड्यात देण्यात येईल. ह्या पाठ्यक्रमासाठीचे दूरस्थ अध्ययन शुल्क आणि परीक्षा शुल्क असे एकत्रित शुल्क जमा करण्याबाबत स्वतंत्रपणे कळवण्यात येईल.

**तत्पूर्वी महाविद्यालय/ परिसंस्थेने IKS साठी एका समन्वयकाची नेमणूक करावी. महाविद्यालय/ परिसंस्थेने IKS Generic पाठ्यक्रमासाठी विद्यार्थ्यांची नोंदणीप्रक्रिया BOD online पोर्टलवर दिलेल्या निर्देशानुसार पूर्ण करावी. यासाठी BOD online पोर्टलवर नियमित पद्धतीने login केल्यानंतर नोंदणीची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.**

**समन्वयक** क्रांति
भारतीय भाषा आणि भारतीय ज्ञानव्यवस्था राष्ट्रीय केंद्र